लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग
दिनांक :- ०९/०४/२०२५

**विषय - सन २०२५ -२६ करीता (कालावधी माहे जून, २०२५ ते मे, २०२६ अखेर) लाडू प्रसाद तयार करुन मागणीप्रमाणे पॅकींग करुन देणे, लाडू प्रसाद पाकीटे संस्थान वाहनाने विक्री काऊंटर्सपर्यंत पोहोच करणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणेकामी नवीन ठेकेदाराची नेमणुक करणेबाबत राबविण्यात आलेल्या ई-निविदेसंबंधी श्री साई सभागृहात आयोजित प्री बीड-सभेचे इतिवृत्त...**

सेवेशी मान्यतेस्तव सादर,

**प्रस्ताविक -** लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत श्री साईभक्तांना प्रसाद घरी घेऊन जाता यावा, या सात्वीक उद्देशाने मोतीचुर लाडू प्रसादाची विविध काऊंटरवर विक्री करणेत येत असते. सदरचा मोतीचुर लाडू प्रसाद तयार करुन उत्पादन तारखेच्या शिक्क्यांसह मागणीप्रमाणे पॅकींग करुन देणे, लाडू प्रसाद पाकीटे संस्थान वाहनाने विक्री काऊंटर्सपर्यंत पोहोच करणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणेकामी सन २०२५-२६ करीता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा भरणेसंदर्भात तसेच ठेकेदारांच्या अडी-अडचणी जाणुन घेणेकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत दि.०९/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे श्री साई सभागृह येथे सभेचे आयोजन करणेत आले होते. सदरहु सभेस खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से. | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | श्री. भिमराज दराडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३. | श्रीमती मंगला वराडे | मुख्य लेखाधिकारी |
| ४. | श्रीमती प्रज्ञा महांडुळे | प्रशासकीय अधिकारी |
| ५. | श्री.शरद डोखे | प्र.कामगार अधिकारी – कामगार विभाग |
| ६. | श्री.दिपक लोखंडे | प्र.अधिक्षक – लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग |
| ७. | श्री. विलास सोनवणे | लिपिक टंकलेखक - लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग |
| ८. | श्री.रविंद्र गायके | लिपिक टंकलेखक – कामगार विभाग |
| ९. | श्री.रावसाहेब कासार | लिपिक टंकलेखक – सामान्य प्रशासन (पी.एफ.) विभाग |

**उपस्थित निविदाधारक / प्रतिनिधी –**

१. के. के. मिल्क, सावळीविहीर प्रतिनिधी – श्री अमोल कवडे
२. फोकस फॅसिलिटी, मुंबई प्रतिनिधी – श्री अमोल भोसले
३. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस, पुणे
४. शुभम सर्व्हीसेस, पुणे
५. श्री.साई केटरर्स, श्रीरामपुर – श्री गणेश वाघ
६. ओम एन्टरप्राईजेस, पुणे – श्री दत्तु चौधरी
७. नित्यार्थ फॅसिलिटी मॅनेजमेंट अॅण्ड सर्व्हीसेस, नाशिक – श्री संदिप चौधरी
८. लॅकोलिसन, प्रा.लि., छ. संभाजीनगर

**कृ. मा.पान नं.०२ वर ...**

येणेप्रमाणे संस्थानचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार लेंडीबागेतील श्री साई सभागृहात आयोजित प्री-बीड सभेस उपस्थित होते. प्रथमतः प्र. अधिक्षक - लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी उपस्थित सर्व ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी यांचे स्वागत केले व सभेस उपस्थित असलेल्या सर्व ठेकेदार व प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या घेणेत आल्या. तसेच दिवसेंदिवस दर्शनार्थींची संख्या वाढत असल्याने दैनंदिन सरासरी २५ क्विंटल बुंदी प्रसादाची निर्मिती करावी लागणार असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे ठेकेदारांना निविदेची माहिती देतांना ई-निविदा फी रक्कम रुपये २२,०००/- व निविदा बयाना रक्कम रु.२,२०,०००/- अशी असल्याची माहिती दिली. तसेच ठेकेदारांना प्री.बीड सभेस उपस्थित राहणेबाबत दि.०५/०४/२०२५ रोजी ई-मेल व दि.०८/०४/२०२५ रोजी दुरध्वनीवरुन कळविण्यात आले असल्याची माहिती उपस्थित अधिका-यांना दिली. सदरहु सभेसाठी एकुण ०८ ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सदरचे प्री-बीड सभेत ई-निविदेमधील काही अटी-शर्तीमध्ये सुधारणा करणेबाबत चर्चा झाली. त्यामध्ये –

| अट क्र. | निविदेतील अटी-शर्ती | शुध्दीपत्रक |
|---|---|---|
| C (७) | तयार करुन पॅकींग झालेल्या लाडू प्रसाद पाकीटे / बॉक्सची ठेकेदाराकडील कर्मचा-यांनी लाडू विक्री काऊंटर्सपर्यंत संस्थानचे वाहनाने पोहोच करुन देणे. | तयार करुन पॅकींग झालेल्या लाडू प्रसाद पाकीटांचे मोजलेली क्रेटस संस्थान वाहनात भरणे व संस्थान. प्रतिनिधींने ठरवुन दिलेल्या संस्थान वाहनाने आपले कर्मचा-यांमार्फत गाडीतुन उतरवुन लाडू विक्री काऊंटर्सपर्यंत पोहोच करुन देणे. |
| M (२४) | नवीन अट | गर्दीचे व उत्सवाचे काळात विभागाचे मागणीनुसार संस्थानने ठरवुन दिलेल्या किचनमधील गॅस भट्टया पुर्ण क्षमतेने चालविणे व सदर गॅस भट्टयांवर त्यानुसार आवश्यक मनुष्यबळाची नेमणुक करणे संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील. विभागाचे मागणीनुसार गॅस भट्टया पुर्ण क्षमतेने चालू न राहील्यास संबंधीत ठेकेदारावर एकुण बिलाचे ५ टक्के दंडात्मक कारवाई करणेत येईल व सदरची रक्कम त्याच महिन्यातील बिलातुन ताबडतोब वसुल करणेत येईल. |
| M (२५) | नवीन अट | गर्दीचे कालावधीमध्ये एका कर्मचा-यांकडुन ८ तासांपेक्षा जास्त वेळ काम करुन घेता येणार नाही. त्याच त्याच कर्मचा-यास पुन्हा काम दिल्यास सदर कर्मचा-याची कार्यक्षमता कमी होत जाते. त्याकरीता एका शिफ्टसाठी एकच आचारी समुह वापरावा व पुढील शिफ्टसाठी नवीन आचारी समुहास नियुक्त करणे बंधनकारक राहील, असे दिसुन न आल्यास आपणावर संस्थान प्रशासन ठरवतील त्यानुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल. |
| M (२६) | नवीन अट | गर्दी व उत्सवाचे कालावधीत तळलेली मोतीचुर बुंदी साठविणेकामी इनर (FDA Approved Plastic Bag) या संबंधीत ठेकेदार यांनी स्वःखर्चाने उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. |

कृ. मा.पान नं.०३ वर ...

यांव्यतिरिक्त अधिक्षक – लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी उपस्थित ठेकेदारांना कामाचे स्वरुप थोडक्यात समजावुन सांगितले. ठेकेदारांनी ई-निविदेतील इतर अटी-शर्ती वाचल्या असुन त्याबाबत कोणतीही शंका नसल्याचे सांगितले.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे उक्त्या मजुरी दराने लाडू प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी दि.०९/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री साई सभागृह येथे आयोजित प्री-बीड सभेचे इतिवृत्त (शुध्दीपत्रक) शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास मान्यता असावी.

(विलास सोनवणे)
लिपिक टंकलेखक

(दिपक लोखंडे)
**प्र.अधिक्षक,**

(प्रज्ञा महांडुळे)
**प्रशासकीय अधिकारी,**

(भिमराज दराडे)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**

9-4-25
(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

प्रत :- माहिती तंत्रज्ञान - प्रसिध्दी विभाग.

09/04/2025 9/4/25